MHPU180017632022

नि. दिवाणी दावा क्र.२९३/२०२२
शंकर व इतर
विरुध्द
संजय व इतर

निशाणी क्रमांक ३५ वरील आदेश
(पारीत दिनांक १५/०३/२०२५)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.१ संजय चंदर उर्फ चंद्रकांत जावळे यांचे वारस अभिलेखावर घेण्याकामी पुढील प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा निरंतर मनाई करीता दाखल केला असून दरम्यानच्या काळात दावा चालु असताना प्रतिवादी क्र. १ संजय चंदर उर्फ चंद्रकांत जावळे हे दिनांक २५/०१/२०२३ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तुतचा दावा हा स्थावर मिळकतीचा असल्याकारणाने वादी यांना संधी देणे गरजेचे आहे. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेण्याकामी दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी क्र. २ यांच्या मार्फत प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करण्यात आले. त्यांच्या म्हणण्यानुसार वादी यांना प्रतिवादी क्र. १ मयत झाल्याची माहिती पुर्वीपासून होती मात्र त्यांनी निष्काळजीपणे प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द करण्याची विनंती त्यांनी केली.

४. वादी यांच्या अर्जातील तसेच प्रतिवादी यांच्या दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी त्यांच्या अर्जासोबत प्रतिवादी क्र. १ संजय चंदर उर्फ चंद्रकांत जावळे मयत झाल्याबाबत त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र निशाणी ३० वरील यादीनुसार दाखल केलेले आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुतचा दावा हा स्थावर मिळकती बाबतचा असल्याचे दिसून येते. तसेच प्रतिवादी क्र. १ हे दिनांक २५/०१/२०२३ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादी यांनी दाखल केलेला अबेटमेंट रद्द करण्याकामी व विलंबाकरीताचा अर्ज यापुर्वीच मंजूर झालेले आहेत. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचा

विचार करता वादी यांना संधी देऊन प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणे वादी यांनी यापुर्वी अबेटमेंट रद्द होऊन मिळण्याकामी निशाणी २७ नुसार अर्ज दाखल केलेला होता. जो की, दि. २०/१२/२०२४ रोजी खर्चासह मंजूर झालेला असल्याने पुन्हा वादींवर नव्याने खर्च लादने योग्य होणार नाही. त्यामुळे सर्व बाबींचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे योग्य हाईल. करीता मी, पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

०१ सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२ वादी यांना प्रतिवादी क्र.१ संजय चंदर उर्फ चंद्रकांत जावळे यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

०३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KALDATE SHARAD BALBHIM
Date: 2025.03.18 16:30:23 +0530

दिनांक- १५/०३/२०२५.

**(शरद ब. काळदाते )**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, दौंड,जि. पुणे.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F file, Order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | Deepak A. Merukar, Grade-3 |
| Court / Panel | :- | (Sharad B. Kaldate)<br>2nd Jt. C.J.J.D. & Judicial Magistrate First Class (Court No. 2) Daund. |
| Order / Judgment date | :- | 15/03/2025. |
| Order / Judgment singed by the Presiding Officer on | :- | 15/03/2025. |
| Order/ Judgment uploaded on | :- | 18/03/2025. |